ePaper
मविआचे ठरले, युतीत संभ्रम; काँग्रेस, ठाकरे-शरद पवार गटांचे जागावाटप पूर्ण!



|| वर्ष - 7 | अंक - 320 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 10 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- सहाही मतदार संघात मताधिक्य!
- अमोल कोल्हेंचा 'गनिमी कावा'!
- महिला सशक्तीकरणाची नवी पहाट
- राज ठाकरेंचा महायुतीला पाठिंबा!

## अतिक्रमणामुळे नदीचे अस्तित्व धोक्यात

# 'मुळे'चा श्वास गुदमरला!

### » महापालिका प्रशासनाचा कानाडोळा : पर्यावरणाचा होतोय ऱ्हास

| पिंपरी | महाईन्यूज

**वाकड गावठाणातील स्मशानभूमी लगतच्या मुळा नदीपात्रात भराव टाकून अनेक व्यावसायिक बांधकामे उभी करण्यात आली आहेत. सद्यस्थितीला अनेक मोठी बांधकामे सुरु आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास करून उभारल्या जाणाऱ्या या धोकादायक बांधकामांमुळे भविष्यात मोठे संकट ओढविण्याची शक्यता आहे. मात्र, महापालिका प्रशासन या प्रकाराकडे पूर्णपणे कानाडोळा करत असल्याचा आरोप होत आहे.**





या जागेवर पूर्वी नदीपात्राला लागून तीव्र उतार (घळई) होता. तेथे अंत्यविधी देखील केले जायचे मात्र, नदीपात्रात हळूहळू भराव टाकून हा तीव्र उतार गायब करण्यात आला आहे. या भराव टाकलेल्या जागेशेजारीच पंपिंग स्टेशन देखील आहे, असे असतानाही महापालिका केवळ नोटीस बजाविण्याचे सोपस्कार पूर्ण करते. मग, ही अतिक्रमणे हटविण्याची नेमकी जबाबदारी आहे कोणाची ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. महापालिकेने वाकड चौक ते गावाठाण व स्मशानभूमीपर्यंत प्रशस्त काँक्रीटचा रस्ता विकसित केला आहे. स्मशानभूमी लगतच्या नदीपात्रातील मोकळ्या जागेत अंत्यविधीला येणारी ग्रामस्थ आपली वाहने उभी करायचे. मात्र, गेल्या वर्षभरापासून पूररेषेतेच भराव टाकून किराणा दुकान, गॅरेज, पान टपरी यासारखी अनेक दुकाने थाटली गेल्याने नदीपात्राची अवस्था दयनीय झाली आहे.

नदीच्या अस्तित्वालाच धोका वाकड व पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या मुळा नदीचे पात्र या धोकादायक अतिक्रमणांनी कमालीचे निमुळते झाल्याने नदीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे.

वाकड हद्दीत तसेच नदी पलीकडे पुण्याच्या हद्दीत देखील काही स्थानिकांनी भराव, राडा-रोडा टाकून पात्र कमालीचे अरुंद केले आहे. पर्यावणाचा समतोल ढासळवू पाहणाऱ्या या अविवेकी कृतींमुळेच २०१७ च्या पावसाळ्यात नदीपात्राचे पाणी अर्ध्या वाकडमध्ये घुसून मोठा जलप्रलय आला होता. तरीही पर्यावरण व अतिक्रमण विभागाने याबाबत काय बोध घेतला ? अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांमध्ये व्यक्त केली जात आहे.

> **वाकड गावातील मुळा नदीपात्रात किंवा अन्य नदीपात्रात भराव, राडारोडा टाकण्याला प्रतिबंध करणे व अतिक्रमणे रोखण्याची जबाबदारी महापालिकेच्या सर्वच विभागांची आहे. 'ड' क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी व अतिक्रमण विभागाने याला अंकुश लावत नदीपात्रात होणारे अतिक्रमण रोखण्यासाठी उपाय योजना केल्या पाहिजे.**
> **- संजय कुलकर्णी,** सह-शहर अभियंता, पर्यावरण विभाग.

> **अनधिकृत बांधकाम विभागाचे बीट निरीक्षक व अन्य अधिकाऱ्यांच्या पथकाला पाठवून अशा बांधकामधारकांना नोटीस बजावण्यात येईल. दोषींवर दंडात्मक किंवा फौजदारी स्वरूपाची कारवाई केली जाईल. तसेच प्रतिबंधात्मक उपाय योजना केल्या जातील.**
> **- अंकुश जाधव,** 'ड' क्षेत्रिय अधिकारी.

वाकड गावाच्या सौंदर्याला बाधा नदीपात्रालगत लाल रेषा, निळी रेषा व पूररेषेत काही स्थानिकांच्या जागा आहेत. यापैकी काही जणांकडून अतिक्रमणात भर घातली जात आहे. कोट्यवधी रुपये खर्चून महापालिकेने वाकड गावठाणात रस्ता विकसित केला. स्मशानभूमीचे सुशोभीकरण केले आहे. मात्र, स्मशानभूमीला लागून अनेक पत्राशेड व दुकाने थाटली गेल्याने पर्यावरणाची हानी तर झालीच. त्याशिवाय या बांधकामांच्या बकालीकरणामुळे गावच्या सौंदर्याला देखील बाधा पोहचत असल्याने जनतेच्या कोट्यवधी रुपयांवर पाणी पडल्याची कुजबूज दबक्या आवाजात सुरु आहे.

# सहाही मतदार संघात आम्हाला मताधिक्य!

## » मुरलीधर मोहोळ : उमेदवाराला निधी मिळाला म्हणजे जनतेचे प्रेम मिळाले असे नव्हे!

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**एखाद्या उमेदवाराला कार्यक्रमात निधी दिला म्हणजे त्याला लोकांचं प्रेम मिळालं असं होत नाही. तुम्ही लोकांसाठी काय आहात आणि त्यांच्यासाठी काय करणार आहात हे जास्त महत्वाचे आहे. माझ्यासोबत पुणेकरांचे प्रेम आहे.**



आम्ही पुणेकर नागरिकांचे मनं जिंकली आहेत. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत देखील पुणेकर नागरिक माझ्या पाठीशी उभे राहतील आणि सहाही विधानसभा मतदारसंघात मताधिक्य घेणार असल्याचा विश्वास पुणे लोकसभा भाजप- महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केला. पुणे लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीचे मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीकडून आमदार रवींद्र धंगेकर, तर वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे यांच्यात तिरंगी लढत होणार आहे. या तीनही उमेदवारांनी विविध माध्यमातून प्रचाराला सुरुवात केली आहे. दोन दिवसांपूर्वी कोथरूड विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. त्या मेळाव्यात आमदार रवींद्र धंगेकर यांना कार्यकर्त्यांनी ४२ हजारांच्याc निधीही थैली दिली. त्यावरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. त्याबाबत मोहोळ यांना विचारले असता मोहोळ म्हणाले, कोथरूडमधील एका कार्यक्रमात कोणाला तरी (रविंद्र धंगेकर) नागरिकांनी निधी दिल्याचे सांगत असला, तर त्यावर मला बोलायच नाही. पण तुम्हाला (रविंद्र धंगेकर) निधी मिळाला म्हणजे प्रेम मिळाले असे होत नाही. पण माझ्यासोबत पुणेकरांचे प्रेम आहे. तुम्ही लोकांसाठी काय करणार आहात आणि काय आहात, हे अधिक महत्वाचे आहे. मुरलीधर मोहोळ पुढे म्हणाले की, भाजपा हा लोकशाही मानणारा असून त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे मी मुरलीधर मोहोळ आहे. माझ्यासारख्या एका कार्यकर्त्याला पक्षाने पुणे लोकसभेची उमेदवारी दिली आहे. त्यामुळे मी खूप आनंदी आहे. देशात ४०० हून अधिक खासदार निवडून आणण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. पुणे लोकसभेचा विचार करायचा झाल्यास पुण्यात केंद्र सरकारच्या विविध योजनेचा तब्बल अडीच लाख नागरिकांनी लाभ घेतला आहे. आजवर पुणेकर नागरिक नेहमीच भाजप पक्षाच्या पाठीशी राहिले आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत देखील पुणेकर नागरिक माझ्या पाठीशी उभे राहतील आणि सहाही विधानसभा मतदारसंघात मताधिक्य घेणार असल्याचा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

### साधेपणा असावा तर असा...

» मराठी नुतन वर्ष अर्थातच गुढीपाडव्याच्या निमित्ताने पुणेकर तांबडी जोगेश्वरी माता मंदिरात दर्शनासाठी गर्दी करतात. या विशेष दिनी पुण्यातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनीही देवीचे आशीर्वाद घेतले. यावेळी आपल्या साधेपणाने मुरली अण्णांनी लोकांची मने जिंकली. त्याचे झाले असे की, मुरलीधर मोहोळ हे ग्राम गुढी उभारण्याकरिता तांबडी जोगेश्वरी मंदिराच्या इथे गेले होते यानंतर मोहोळ यांनी यांनी तांबडी जोगेश्वरीचे दर्शन घेण्यासाठी गेले.त्यावेळी गुढीपाडवा असल्यामुळे या मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. त्यामुळे मुरलीधर मोहोळही सामान्य नागरिकांप्रमाणे दर्शनासाठी रांगेत उभे ठाकले. त्यांच्या याच साधेपणाने पुन्हा एकदा पुणेकरांची मने जिंकली आहेत. यावेळी मुरलीधर मोहोळ यांच्यासमवेत भाजपा नेते हेमंत रासने आणि कार्यकर्त्यांनी तांबडी जोगेश्वरीच्या चरणी माथा टेकवला.

# लांडेंच्या भेटीतून आढळरावांचे पारडे जड!

## » लोकसभा रणसंग्राम : नाराजी दूर झाल्यास भोसरीतून मताधिक्य

। भोसरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज झालेल्या भोसरीतील माजी आमदार विलास लांडे यांची भेट घेऊन त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केला आहे. लांडे यांची नाराजी दूर करण्यात आढळरावांना यश आल्यास त्यांच्या ते पथ्यावर पडणार आहे. महायुतीचा धर्म पाळल्यास भोसरीतून आढळरावांना मोठे मताधिक्य मिळेल असे राजकीय गणित जाणकारांकडून मांडण्यात येत आहे.**



महायुतीमधील अजित दादांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून शिरूरसाठी उमेदवारी मिळेल असा आडाखा माजी आमदार विलास लांडे यांनी बांधला होता. दरम्यानच्या काळात उमेदवारीवरून राजकीय घमासान झाले. माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या बाबत मतदारसंघ विजयी होण्यासाठी अनुकूल असल्याचे स्पष्ट झाले त्यामुळे राष्ट्रवादीत पक्षप्रवेश घडवून आणत त्यांना उमेदवारी देखील बहाल करण्यात आली. या निर्णयामुळे भोसरीचे चाणक्य असलेले विलास लांडे नाराज झाले. उमेदवारी आढळरावांना जाहीर झाल्यापासून ते राजकीय विजनवासात गेल्याचे चित्र होते. माध्यमांना त्यांनी त्यानंतर प्रतिक्रिया दिल्या नाहीत. तसेच राजकीय सार्वजनिक कार्यक्रमांना दांडी मारण्यास त्यांनी सुरुवात केली.

भोसरी विधानसभेत तब्बल पाच लाखांपेक्षा अधिक मतदार आहेत. या मतदारसंघात असणारे विलास लांडे हे महत्वाचे आणि मोठे नेते आहेत. लांडे नाराज झाले तर त्याचा निवडणुकीत मोठा फटका बसू शकतो याची जाणीव आढळराव पाटील यांना आहे. त्यामुळे त्यांनी भोसरी येथील राजमाता जिजाऊ महाविलयातील कार्यालयात जाऊन लांडे यांची भेट घेतली. त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर विविध माध्यमांना प्रतिक्रिया देताना लांडे यांची नाराजी दूर झाल्याचे नरेटिव्ह तयार करण्याचे काम आढळराव पाटील यांनी केले. सोशल मीडियावर देखील लांडे आणि आढळराव यांच्या भेटीचे फोटो व्हायरल झाल्याने त्याची चांगलीच चर्चा रंगली होती. ही चर्चा आढळरावांना सकारात्मक ठरेल असे सांगितले जात आहे. प्रत्यक्ष त्याचा निवडणुकीत किती फायदा होतो पाहणे रंगतदार ठरणार आहे. उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज झालेल्या भोसरीतील माजी आमदार विलास लांडे यांची भेट घेऊन त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केला आहे. लांडे यांची नाराजी दूर करण्यात आढळरावांना यश आल्यास त्यांच्या ते पथ्यावर पडणार आहे.

### लांडे सोबतीला असणे गरजेचे!

» गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत माजी आमदार विलास लांडे यांना ९० हजार मते पडली आहेत. त्यांचा पराभव झाला खरा. मात्र त्यावेळी त्यांच्या राजकीय खेळ्या चांगल्याच चर्चेत राहिल्या होत्या. अपक्ष म्हणून निवडणूक लढविताना त्यांनी अजित दादांची मनधरणी करत राष्ट्रवादीच्या उमेदवाराला अर्ज भरायच्या पाच मिनिटे आधीच माघार घ्यायला लावली. थेट चिन्हावर आणि पक्षावर न लढताही त्यांनी वरिष्ठांचा आशीर्वाद आपल्या बाजूने ठेवण्याची किमया केली होती. त्यांच्या या राजकीय खेळ्या अनेकांच्या अडचणीच्या ठरू शकतात याची जाणीव आढळराव पाटील यांना होती. त्यामुळे आधीच भेट घेऊन त्यांची मनधरणी करत लांडे यांची ताकद आपल्या बाजूने ठेवण्याची गरज आढळरावांना देखील निर्माण झाल्याची चर्चा आहे.

# अमोल कोल्हेंचा ‘गनिमी कावा’!

## लोकसभा रणसंग्राम : भोसरीत राष्ट्रवादी दादांची पण ताकद कोल्हेंची!

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना भोसरी विधानसभा मतदार संघातील अनेक माजी नगरसेवकांचा सक्रीय पाठिंबा दिसत आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचा बालेकिल्ला असला तरी, कोल्हे यांनी ‘गनिमी कावा’ करीत भोसरीत आपली ताकद वाढवली आहे. परिणामी, महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना भोसरी विधानसभा मतदार संघातून मताधिक्य मिळवताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.**






ग्राउंड रिपोर्ट

गत निवडणुकीत माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना भोसरी विधानसभा मतदार संघातून सर्वाधिक ३७ हजार मतांचे लीड मिळाले होते. यावेळी राज्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदललेली आहेत. सध्यस्थितीला भाजपाचे विद्यमान आमदार महेश लांडगे आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी आमदार विलास लांडे दोघेही महायुतीमध्ये आहेत. त्यामुळे आढळराव पाटील यांचे पारडे जड झाले आहे, असा दावा केला जातो. परंतु, ग्राउंडवरील वस्तुस्थिती वेगळी आहे. आजी-माजी आमदार लांडगे आणि लांडे यांची साथ असली तरी, आढळराव पाटील यांना दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांना जोडण्यात अद्याप अपयश आले आहे. याउलट, अजित पवार यांच्या कट्टर समर्थक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चऱ्होली येथील माजी नगरसेविका विनया तापकीर, माजी नगरसेवक विजय रसाळ यांच्यासह अनेकांनी डॉ. कोल्हे यांना साथ दिलेली पहायला मिळत आहे. डॉ. कोल्हे यांच्या दौऱ्यात अनेक माजी नगरसेवकांनी पुढाकार घेतला आणि प्रचाराचा नारळ फोडला आहे.

दुसरीकडे, माजी आमदार विलास लांडे यांची समजूत काढल्यानंतर आढळराव पाटील यांच्या दौऱ्यात माजी नगरसेवक आणि लांडे समर्थकांचा सक्रीय सहभाग पहायला मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, तसे चित्र नाही. अजित पवार यांचे समर्थक आणि मोशीतील माजी नगरसेवक वसंत बोराटे यांचीही आढळराव पाटील यांच्या दौऱ्यात अनुपस्थिती जाणवली होती. त्यामुळे महायुतीमध्ये नेते एकवटलेले दिसतात. मात्र, दुसऱ्या फळीतील नेते आणि कार्यकर्ते अद्याप ‘वेट अँन्ड वॉच’च्या भूमिकेत आहेत, असे चित्र आहे.

### विलास लांडे, अजित गव्हाणे यांची कसरत…

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार विलास लांडे आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांना लोकसभा निवडणुकीत ‘चांगला परफॉर्मन्स’ दाखवावा लागणार आहे. वास्तविक, विधानसभा निवडणुकीचे गणित लक्षात घेता भोसरीची जागा महायुतीच्या जागावाटपामध्ये भारतीय जनता पार्टीकडे राहणार आहे. कारण, विद्यमान आमदार म्हणून महेश लांडगे यांचा उमेदवारीसाठी पहिला दावा होणार आहे. त्यामुळे विधानसभा उमेदवारी मिळवायची असेल, तर लांडे आणि गव्हाणे या दोन्ही इच्छुक नेत्यांना भोसरीतून शिवाजीराव आढळराव पाटील यांना ‘लीड’ देण्यासाठी प्रभावीपणे रणनिती आखावी लागेल. विशेष म्हणजे, ही निवडणूक अजित पवार यांनी प्रतिष्ठेची केली असल्याने “आधी लोकसभेत गुणवत्ता दाखवा… मग विधानसभेचे तिकीट घ्या…” असा अलिखित फतवाच अजित पवार यांनी काढला आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# बोपोडी-खडकीमार्गे वाहतूक वळविल्याने अपघातात वाढ!

## वाहतूक पूर्ववत करा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा छावा मराठा संघटनेचा इशारा

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मेट्रोचे काम पूर्ण झाल्याने खडकी बाजार मार्गे वळविण्यात आलेली वाहतूक जुन्या मुंबई-पुणे मार्गावरून पूर्ववत करण्यात आल्याने खडकीकरांनी सुटकेचा निःश्वास टाकला होता; मात्र, पुन्हा ही वाहतूक बोपोडीतून खडकीमार्गे वळविल्याने वाहतूक कोंडी होऊन अपघातात वाढ झाली आहे. त्यामुळे ही वाहतूक पूर्ववत करून खडकीकरांची वाहतूक कोंडी व अपघातांमधून मुक्तता करावी, अशी मागणी छावा मराठा संघटनेचे पुणे जिल्हाप्रमुख रामभाऊ जाधव यांनी केली आहे.**



जुन्या पुणे मुंबई रस्त्यावरील वाहतूक बोपोडी-खडकी बाजारमार्गे ऑल सेंट स्कुलजवळून वळविण्यात आल्याने मोठी वाहतूक कोंडी होत असून, सांगवी, पिंपळे गुरवमधून पुण्यात जाण्यासाठी नागरिकांना उशीर होत आहे. त्यामुळे किमान येथील वाहतुकीचे नियोजन करण्याची आवश्यकता आहे. वाहनांमुळे खडकीमधील नागरिकांना वाहतूक कोंडी सोबतच अपघातांचाही सामना करावा लागत आहे. तसेच या वाहतुकीचा फटका खडकी बाजार परिसरातील अनेक शाळांतील विद्यार्थ्यांना बसत आहे. विशेषतः सांगवी, पिंपळे गुरव, बोपोडीतून खडकी बाजार परिसरातील लालबहादूर शास्त्री शाळा, आलेगावकर शाळा, एस.व्ही. एस. स्कुल, सेंट जोसेफ स्कुल, तसेच पुण्यात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत आहे. दररोज तास-दोन तास वाहतूक कोंडीत विद्यार्थ्यांना अडकून पडावे लागत आहे. त्यातच उन्हाळा असल्याने उष्णतेचा त्रास सहन करावा लागत आहे.

बोपोडी ते खडकी स्टेशन दरम्यान मेट्रोचे काम दोन वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे जुन्या पुणे-मुंबई मार्गावरील वाहतूक बोपोडीतून खडकी बाजार मार्गे वळविण्यात आली आहे. या मार्गावर किर्लोस्कर ऑइल इंजिन कंपनी, तसेच झोपडपट्टीही आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी वर्दळ असते. त्यातच विद्यार्थ्यांची आणि पालकांची वर्दळ असते. पेन्शनर ज्येष्ठ नागरिक, महिला, कंपनीतील कामगार आदी सर्वांना नित्याच्या वाहतूककोंडीचा सामना करावा लागत आहे.

### एका पादचाऱ्याला जीव गमवावा लागला …

**याबाबत रामभाऊ जाधव यांनी सांगितले, की पुन्हा खडकीमधून वळविण्यात आलेल्या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे. दोन दिवसापूर्वी या वाहतुकीमुळे एका पादचाऱ्याला जीव गमवावा लागला आहे. असे अनेक अपघात गेल्या दीड वर्षांपासून घडत असूनही वाहतूक पोलिसांकडून ठोस नियोजन केलेले दिसत नाही. हे टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी वाहतुकीचे योग्य नियमन करण्याची गरज आहे. अन्यथा छावा मराठा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.**

# विद्यापीठांतला राजकीय हेका




**अभ्यास व त्याच्या तपशीलवार मांडणीच्या बळावर विचारांचा दबदबा निर्माण करणे एक वेळ समजून घेता यईल. मग इतरांना तो विचार भले जहाल व कडवा का वाटेना. मात्र अशाच विचारांचा प्रचार करण्यासाठी धमकी, मारहाण आदी हिंसक कृत्यांचा आधार घेणे हा दहशत निर्माण करण्याचाच प्रकार. अलीकडे अनेक विद्यापीठांना त्याची वेगाने लागण होत असल्याचे दिसते, हे शैक्षणिक वर्तुळासाठी धोक्याचे.**

पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठात अन्य धर्मीय विद्यार्थिनीशी मैत्री करण्यावरून एका मुस्लीम विद्यार्थ्याला झालेली मारहाण याच धोक्याची जाणीव करून देणारी ठरते. वेगवेगळे विचारप्रवाह अंतर्भूत असलेल्या विद्यांचा प्रसार करणारी ही पीठे अभिव्यक्तिस्वातंत्र्याची केंद्रे म्हणूनच ओळखली जातात. अलीकडच्या काही वर्षांत या परिसरांना पडलेला कडवेपणाचा विळखा ही ओळखच पुसून टाकतो की काय अशी शंका आता येऊ लागली. दिल्लीतील जेएनयूपासून सुरू झालेल्या या वाईट प्रवासाचे लोण हळूहळू राज्यातील विद्यापीठांत पसरणे हे चिंताजनक. वास्तविक दोन सज्ञान व्यक्तींनी मैत्री, प्रेम कुणाशी करावे अथवा करू नये हा त्यांचा व्यक्तिगत प्रश्न. त्यात तिसऱ्याला लुडबुड करण्याचा अधिकार नाही. तरीही त्यात कुणी सत्तेच्या जोरावर हस्तक्षेप करत असेल व कारवाईपासून त्याला संरक्षण मिळत असेल तर हा



दहशतीचा वणवा वेगाने पसरायला वेळ लागणार नाही. याआधीही याच विद्यापीठाच्या ललित कला केंद्रात एका नाटकाचा खेळ बंद पाडला गेला. कलावंत विद्यार्थ्यांना मारहाण झाली. अशीच झुंडशाही इतर विद्यापीठातसुद्धा आता डोके वर काढू लागलेली. अलीकडे जाणीवपूर्वक वादाचा विषय ठरवल्या गेलेल्या सावरकरांवर नाटय़प्रयोग का केला म्हणून त्यांचा पुतळा जाळण्याचा प्रकार नागपूरच्या तुकडोजी महाराज विद्यापीठात घडला. त्याला प्रत्युत्तर म्हणून ही जाळलेली जागा गोमूत्राने स्वच्छ करण्याचा प्रयत्नही झाला. हे सारे प्रकार वैचारिक वादविवादाची परंपरा लयाला जाऊन ठोकशाहीच तेवढी उरली हे दर्शवणारे. त्यात उजवे, डावे व मध्यममार्गी असे सारेच सामील. मग ज्या हेतूने या विद्यापीठांची उभारणी झाली त्या शैक्षणिक सुधारणा, विकास व विद्यार्थ्यांच्या कल्याणाचे काय? तो मागे पडत चालला याची चिंता कुणालाच कशी वाटत नाही? विद्यापीठे राजकारणापासून अलिप्त ठेवता येऊ शकत नाहीत हे मान्यच; पण हे राजकारण सभ्य स्वरूपाचे व योग्य नेतृत्व घडवणारे असावे अशीच अपेक्षा होती. त्यालाच आता हरताळ फासला जात आहे. राजकीय शक्तींनी या शैक्षणिक केंद्रांत केलेल्या अनावश्यक हस्तक्षेपामुळे असे होते आहे. बाहेर पडणारा विद्यार्थी हा आमच्याच विचाराचा हवा हा या शक्तींचा आग्रह एकदाचा समजून घेता येईल पण तो कडवाच हवा या अनाठायी दुराग्रहाचे काय? हे कडवेपण केवळ एक पिढीच नाही तर संपूर्ण समाज नासवणारे ठरेल यावर कुणी विचार करणार की नाही? या वैचारिक एकारलेपणाचा आग्रह धरण्याच्या वृत्तीचा शिरकाव केवळ विद्यार्थ्यांमध्येच होतो आहे असे नाही. सम्यक दृष्टीचा अभाव असणारे शिक्षकही त्याला बळी पडू लागले आहेत. नागपूर विद्यापीठाच्या अधिसभेत याच कडवेपणाने भारलेल्या काहींनी राम मंदिर निर्मितीसाठी सरकारच्या अभिनंदनाचा ठराव आणला. या निर्मितीचा आनंद अनेकांना होणे यावर कुणाचा आक्षेप असण्याचे काही कारण नाही पण याचा शिक्षण क्षेत्राशी संबंध काय? अधिसभा अशा विषयांवरील चर्चेसाठी असते काय? या प्रश्नांचा विचार न करता शिक्षकच जर अशी विवेकशून्य कृती करत असतील तर अपेक्षेने बघायचे तरी कुणाकडे? अधिसभेतील काही समंजस सदस्यांनी हस्तक्षेप केल्यावर हा ठराव मागे घेतला गेला पण यातून दिसली ती स्वत:चे कडवेपण सिद्ध करून सत्तेच्या नजरेत भरण्याची वृत्ती. ती आणखीच घातक. एके काळी याच विद्यापीठांनी देशाला अनेक नेते दिले. त्या साऱ्यांमध्ये घटनात्मक लोकशाहीची मूल्ये रुजलेली होती व आहेत. आताचे वातावरण पाहू जाता असे नेतृत्व खरेच तयार होईल का अशी शंका येते. विचार कोणताही असो, तो समजून घेत स्वत:चे पक्के मत तयार करणारा विद्यार्थी घडवणे हेच विद्यापीठाचे कार्य. ते लोकशाहीची बूज राखतच पार पाडले जायला हवे याकडे कटाक्षाने लक्ष देण्याची जबाबदारीसुद्धा याच विद्यापीठांची. दुर्दैवाने विद्यापीठ प्रशासन 'कडव्यां'च्या हातचे बाहुले बनत चाललेले.

## संपादकीय »

# कराग्रे वसते लक्ष्मी..

***अखेर डॉ. विजय केळकर बोलले. वस्तू आणि सेवा कर व्यवस्थेचे मूळ आरेखनकार असलेले डॉ. केळकर यांनी ही नवीन कररचना प्रणाली अस्तित्वात आली***

अखेर डॉ. विजय केळकर बोलले. वस्तू आणि सेवा कर व्यवस्थेचे मूळ आरेखनकार असलेले डॉ. केळकर यांनी ही नवीन कररचना प्रणाली अस्तित्वात आली तेव्हापासून (२०१७) 'जीएसटी'विषयी चकार शब्द कधी काढला नव्हता. सुरुवातीच्या काळात या कररचनेची चांगलेच फे फे उडाली. या कररचनेत वारंवार बदल केले गेले. एखादा घटक कधी जीएसटीच्या आत, कधी बाहेर असे अनेकदा झाले. गुजरात विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर खाखरा हा खाद्यपदार्थ समस्त भारतीयांसाठी जणू जीवनावश्यक आहे असे समजून त्यावरील करात कपात केली गेली आणि पंजाब निवडणुकांचा विचार करून गुरुद्वारांतील लंगरसाठी केली जाणारी धान्यखरेदी या करातून वगळली गेली. तरीही डॉ. केळकर यांनी या कराविषयी जाहीर प्रतिक्रिया देणे नेहमीच टाळले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात नारी शक्ती वंदन विधेयक संसदेत मांडण्यात आलं. ते एकमताने मंजूर झालं आणि लोकसभेसह राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला.

# महिला सशक्तीकरणाची नवी पहाट

हे ऐतिहासिक पाऊल उचलण्याची इच्छाशक्ती व धमक फक्त आणि फक्त माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या ठायीच आहे. हे विधेयक प्रत्यक्षात येऊन लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना आरक्षण मिळण्यासाठी आणखी काही वर्ष जावी लागतील. पण आज खरंच किती राजकीय पक्ष महिलांना निवडणुकीच्या प्रक्रियेत केंद्रस्थानी आणायला इच्छुक असतात? या बाबतीतही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील राज्यातील महायुतीचे घटक पक्ष आघाडीवर आहेत. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारांचा वारसा घेऊन राज्याला विकासाच्या दिशेने घेऊन जाणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आतापर्यंत महिला शक्तीला मोठं स्थान दिलं आहे. किंबहुना, राज्यात महिला सशक्तीकरणाची नवी पहाट उमलत असून राज्यातील महायुती सरकार या सशक्तीकरणाचे शिल्पकार आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. राज्याच्या




लोकसभा निवडणुकीचे सर्व उमेदवार अद्याप जाहीर झालेले नाहीत. पण महायुतीतील घटक पक्षांनी आतापर्यंत सर्वाधिक महिलांना उमेदवारी जाहीर केली आहे. महायुतीच्या ३७ जागांवरील उमेदवारांची नावं पुढे आली आहेत. या ३७ पैकी ८ मतदारसंघांत महायुतीने महिला उमेदवार दिले आहेत. यात पंकजा मुंडे, डॉ. भारती पवार, हीना गावित, नवनीत राणा, रक्षा खडसे, सुनेत्रा पवार, राजश्री पाटील आणि स्मिता वाघ यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. त्या तुलनेत महाविकास आघाडीनं ३७ पैकी फक्त सहा जागांवर महिला उमेदवार दिले आहेत. त्यातहीरामटेकच्या जागेवर रश्मी बर्वे यांना दिलेली उमेदवारी वादात सापडली आहे.महायुतीने आतापर्यंत जाहीर केलेल्या उमेदवारांपैकी २१ टक्के महिला आहेत. मला पूर्ण कल्पना आहे की, नारी शक्ती वंदन विधेयकातील ३३ टक्क्यांपासून हा उमेदवारीचा आकडा अद्याप खूप लांब आहे. पण ही सुरुवात नक्कीच आशादायक आहे. राजकीय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी महायुती सरकारने आतापर्यंत नेहमीच विविधांगी प्रयत्न केले आहेत. आमच्या शिवसेनेचंच उदाहरण द्यायचं, तर विधान परिषदेच्या सभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे, आमदार डॉ. मनीषा कायंदे किंवा यामिनीताई जाधव, खासदार भावनाताई गवळी.. सगळ्याच महिलांना प्रोत्साहन मिळेल असं वातावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तयार केलं आहे.सक्रिय राजकारणात इच्छुक नसलेल्या, अशा कोटय़वधी महिलांसाठी महायुती सरकारने आपल्या अत्यंत छोटय़ा कार्यकाळात महिलांच्या सक्षमीकरणाच्या आणि विकासाच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. यात मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाचा फार मोठा वाटा आहे.

## || अभंगवाणी ||



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज ठाकरेंचा महायुतीला बिनशर्त पाठिंबा!

## राज ठाकरे यांच्या निर्णयाचं स्वागत : मुख्यमंत्री शिंदे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आणि महायुतीला पाठिंबा जाहीर केला आहे. मनसेच्या गुढी पाडवा मेळाव्यात राज ठाकरे काय भूमिका घेणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. त्यावर आज पडदा पडला आहे. राज ठाकरे यांनी महायुतीला लोकसभे निवडणुकीत बिनशर्त पाठिंबा दर्शवला आहे.**



फक्त नरेंद्र मोदींच्या कणखर नेतृत्वासाठी मी भारतीय जनता पार्टी, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांना बिनशर्त पाठिंबा देत आहे असं राज ठाकरेंनी जाहीर केलं आहे. त्याचबरोबर राज ठाकरे यांनी लोकसभा लढवणार नसल्याचंही स्पष्ट केलं आहे. राज ठाकरे यांची मनसे लोकसभा निवडणूक लढवणार नसली तरी राज यांनी महाराष्ट्र सैनिकांना विधानसभेच्या तयारीली लागण्याचे आदेश दिले आहेत.दरम्यान, राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिल्यानंतर यावर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीदेखील यावर भाष्य केलं आहे. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, “हिंदुत्वासाठी राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिला आहे.” राज ठाकरे यांनी महाराष्ट्र सैनिकांना विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे आदेशही दिले आहेत. यावर एकनाथ शिंदे म्हणाले, त्यांचं बरोबर आहे. त्यांचा एक पक्ष आहे आणि प्रत्येक पक्षाला निवडणूक लढवण्याचा अधिकार आहे. आता लोकसभा निवडणूक होऊ द्या. लोकसभा निवडणूक झाल्यावर आपण विधानसभेचं पाहू.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मी राज ठाकरे यांच्या निर्णयाचं स्वागत करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आपला देश वेगाने पुढे जातोय. त्यांच्या नेतृत्वात देशाचा विकास झाला आहे. मोदींनी आपला देश पुढे नेला आहे. त्यामुळेच राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिला आहे. या पाठिंब्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.राज ठाकरे म्हणाले, “मी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचाच अध्यक्ष राहणार. तुमच्या सगळ्यांच्या विश्वासावर मी हा पक्ष उभा केला आहे. त्याला १८ वर्षं झाली आहेत. कुठल्या पक्षाचा प्रमुख होणार ही गोष्ट माझ्या मनाला शिवतही नाही. मी मनसे नावाचं हे आपत्य जन्माला घातलं आहे आणि मी ते वाढवणार आहे” असं म्हणत राज ठाकरेंनी शिवसेना ताब्यात घेणार का? या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. राज ठाकरे म्हणाले “जागावाटपावरही चर्चा झाली. मात्र मी त्यावर बोलणं टाळलं. त्याचबरोबर मी रेल्वेचं इंजिन या मनसेच्या निवडणूक चिन्हाव्यतिरिक्त कोणत्याही पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवण्यास स्पष्टपणे नकार दिला. मनसे अध्यक्ष म्हणाले, “नरेंद्र मोदींकडून देशाला अपेक्षा आहेत. आज या जगात सर्वात तरुण देश असेल तर तो आपला भारत देश आहे. सर्वाधिक तरुण सध्या भारतात आहेत. या तरुणांना-तरुणींना चांगल्या शिक्षणाची गरज आहे. तंत्रज्ञानाची गरज आहे. त्यासाठी राज्य सरकार आणि केंद्र सरकारने काम केलं पाहिजे. आणखी १० वर्षांनी हा देश वयस्कर व्हायला लागणार. माझी मोदींकडून अपेक्षा आहे की भारतातल्या तरुणांकडे लक्ष द्या. भारताचं भविष्य हेच तरुण-तरुणी आहेत.

### हिंदुत्वासाठी महायुतीला पाठिंबा

» प्रत्येक देशाचा एक काळ असतो. जपानमध्ये एक काळ होता. अनेक कंपन्या तिथे उभ्या राहिल्या. अनेक व्यवसाय उभे राहिले. घुसळून निघाला तो देश, असा आपला देश घुसळून निघाला पाहिजे. तसं जर घडलं नाही तर सगळ्याच गोष्टींवरचा समाजाचा विश्वास उडून जाईल, देशात अराजक येईल” असं राज ठाकरेंनी म्हटलं आहे. फक्त नरेंद्र मोदींच्या कणखर नेतृत्वासाठी मी भारतीय जनता पार्टी, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांना बिनशर्त पाठिंबा देत आहे असं राज ठाकरेंनी जाहीर केलं आहे. त्याचबरोबर राज ठाकरे यांनी लोकसभा लढवणार नसल्याचंही स्पष्ट केलं आहे. राज ठाकरे यांची मनसे लोकसभा निवडणूक लढवणार नसली तरी राज यांनी महाराष्ट्र सैनिकांना विधानसभेच्या तयारीली लागण्याचे आदेश दिले आहेत.दरम्यान, राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिल्यानंतर यावर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीदेखील यावर भाष्य केलं आहे. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, “हिंदुत्वासाठी राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिला आहे.

---

# उद्धव ठाकरेंची ‘उठ-बस’ सेना : मुख्यमंत्री शिंदे

## राज ठाकरे यांचा महायुतीला पाठिंबा देण्याच्या निर्णयाचे स्वागत

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना ही ‘ उठ-बस’ सेना आहे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. ते मंगळवारी रात्री नागपूर विमानतळावर माध्यमांशी बोलत होते. त्यांनी राज ठाकरे यांचा महायुतीला पाठिंबा देण्याच्या निर्णयाचे स्वागत केले व त्यांचे आभार मानले.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बुधवारी नागपूरलगत कन्हान येथे प्रचार सभा आयोजित करण्यात आली आहे. त्यासाठी शिंदे मंगळवारी रात्री नागपूरमध्ये आले. मोदी यांनी सोमवारी चंद्रपूरच्या सभेत उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता त्यांच्या पक्षाचा ‘नकली शिवसेना’ असा उल्लेख केला होता. त्यावर उद्धव ठाकरे यांनी टीका करीत खंडणीखोर पक्षाचे नेते शिवसेनेला नकली ठरवून गेले, त्यांच्यासोबत चायनिज माल बसला आहे, अशी टीका केली होती. याबाबत शिंदे यांना विचारणा केली असता ते म्हणाले, “ उद्धव ठाकरे यांची शिवसेना ही ‘उठ-बस’ सेना आहे. आमची शिवसेना बाळासाहेबांच्या विचाराची सेना आहे. काँग्रेस प्रणीत शिवसेना नाही. बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली देणाऱ्यांनी, सावरकरांचा अवमान करणाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसणाऱ्यांनी आमच्यावर टीका करू नये, त्यांनी सत्तेसाठी धनुष्यबाण गहा ठेवला. रोकड मोजणाऱ्यांना मोदींना भेकड म्हणण्याचा काहीही अधिकार नाही.मोदी यांचे महाराष्ट्रावर विशेष प्रेम आहे. त्यांचे महाराष्ट्राच्या विकासात योगदान आहे. महाराष्ट्रातून आम्ही त्यांना ४५ जागा जिंकून देऊ. राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिल्याबद्दल शिंदे यांनी त्यांचे आभार मानले.उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना ही ‘ उठ-बस’ सेना आहे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

### गुंड हे राज्य सोडून गेले

» मनसे अध्यक्ष राज ठाकरे गुढी पाडवा मेळाव्यात नेमकी काय भूमिका घेणार? याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. राज ठाकरे महायुतीला पाठिंबा देतील अशा चर्चा होत्या आणि घडलंही तसंच राज ठाकरेंनी आपण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या खंबीर आणि कणखर नेतृत्वासाठी भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादीला पाठिंबा देत आहोत हे जाहीर केलं. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी पोस्ट करत राज ठाकरेंचे आभार मानले आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या कुशल नेतृत्वावर विश्वास ठेवत, विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी, भक्कम महाराष्ट्राच्या उभारणीसाठी, भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीला पाठिंबा दिल्याबद्दल मी मनसेचे प्रमुख श्री राज ठाकरे जी यांचा अत्यंत आभारी आहे. आपण सारे मिळून निश्चितच जनतेच्या आशा-आकांक्षांच्या पूर्ततेसाठी संपूर्ण ताकदीनिशी संकल्पबद्ध होऊ या! अशी पोस्ट देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

# स्त्रियाही खोल समुद्रात जाऊ शकतात!

## कोस्ट गार्डप्रकरणी सुप्रिम कोर्टाने केंद्राला फटकारले

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भारतीय तटरक्षक दलातील महिला अल्पकालीन सेवा नियुक्ती (एसएसए) अधिकाऱ्याला कायमस्वरूपी सेवेत घेण्यास केंद्र सरकारने नकार दिल्याने सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला फटकारले आहे. न्यायालयाने तटरक्षक दलाच्या अधिकारी प्रियांका त्यागी यांना सेवेत बहाल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. भारतीय तटरक्षक दलाने महिला अधिकाऱ्याला २०२१ मध्ये शॉर्ट सर्व्हिस कमिशन अधिकारी म्हणून कार्यमुक्त केले होते. सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेचे हस्तांतरण करताना पुढील आदेशापर्यंत याचिकाकर्त्याला त्याच्या गुणवत्तेनुसार महत्त्वाचे पद द्यावे, असे निर्देश दिले.**



केंद्र सरकार प्रियंका त्यागी यांच्या याचिकेला विरोध करत असल्याने चंद्रचूड यांनी नाराजी व्यक्त केली. हा भेदभाव संपला पाहिजे. पूर्वी महिला बारमध्ये सामील होऊ शकत नव्हत्या. त्या फायटर पायलट होऊ शकत नव्हत्या. तसंच, तटरक्षक दलात महिलांसाठी स्वच्छतागृहे नसल्याने ते रुजू होण्यास विरोध करत असत. परंतु, तरीही महिला आता नौदलात रुजू झाल्या आहेत. महिला तर ऑपरेशन थिएटर किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या बार काऊन्सिलमध्ये जात असतील तर त्या खोल समुद्रातही जाऊ शकतात. २६ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला एकतर कायमस्वरुपी आयोग स्थापन करा अन्यथा न्यायालय आदेश देईल असे सांगण्यात आले.याचिकाकर्त्या प्रियंका त्यागी यांच्या बाजूने उपस्थित असलेल्या ज्येष्ठ वकील अर्चना पाठक दवे यांनी जोरदार युक्तिवाद केला. ते खंडपीठाला म्हणाले, कोस्ट गार्ड महिला अधिकाऱ्यांशी भेदभाव करतात.

यावर ॲटर्नी जनरल आर वेंकटरामानी यांनी खंडपीठाला सांगितले की नौदल आणि लष्कराची तुलना चुकीची आहे. या दोन्ही यंत्रणा वेगवेगळ्या आहेत.२६ फेब्रुवारी रोजी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं की, "भारतीय तटरक्षक दलात पात्र महिला अधिकाऱ्यांना स्थायी कमिशन (PERMANENT COMMISSION) प्रदान करा. महिलांना यापासून वंचित ठेवता येणार नाही. जर केंद्र सरकार निर्णय घेणार नसेल तर सर्वोच्च न्यायालय त्याबाबत योग्य ती पावले उचलेल."

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी अशा प्रकरणावर याआधीही निकाल दिलेले आहेत. २०२० साली ते सर्वोच्च न्यायलयात न्यायाधीश असताना 'महिलांनाही लष्करात समान संधी द्या', अशा सूचना केंद्र सरकारला दिल्या होत्या. सैन्यातील तुकडीचं नेतृत्व महिलांकडे (कमांड पोस्ट) देण्यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयानं महत्त्वाचा निकाल दिला होता. लष्करातही महिलांना तुकडीचं नेतृत्व दिलं जावं, असे आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिले होते. या आदेशाला केंद्र सरकारनं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. या आव्हान याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठानं महिलांविषयी घेतलेल्या भूमिकेवरून केंद्र सरकारची कानउघडणी केली होती.भारतीय तटरक्षक दलातील महिला अल्पकालीन सेवा नियुक्ती (एसएसए) अधिकाऱ्याला कायमस्वरूपी सेवेत घेण्यास केंद्र सरकारने नकार दिल्याने सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला फटकारले आहे. न्यायालयाने तटरक्षक दलाच्या अधिकारी प्रियांका त्यागी यांना सेवेत बहाल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. भारतीय तटरक्षक दलाने महिला अधिकाऱ्याला २०२१ मध्ये शॉर्ट सर्व्हिस कमिशन अधिकारी म्हणून कार्यमुक्त केले होते. सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायलयात प्रलंबित असलेल्या याचिकेचे हस्तांतरण करताना पुढील आदेशापर्यंत याचिकाकर्त्याला त्याच्या गुणवत्तेनुसार महत्त्वाचे पद द्यावे, असे निर्देश दिले.

### महिला आता नौदलात रुजू झाल्या

» केंद्र सरकार प्रियंका त्यागी यांच्या याचिकेला विरोध करत असल्याने चंद्रचूड यांनी नाराजी व्यक्त केली. हा भेदभाव संपला पाहिजे. पूर्वी महिला बारमध्ये सामील होऊ शकत नव्हत्या. त्या फायटर पायलट होऊ शकत नव्हत्या. तसंच, तटरक्षक दलात महिलांसाठी स्वच्छतागृहे नसल्याने ते रुजू होण्यास विरोध करत असत. परंतु, तरीही महिला आता नौदलात रुजू झाल्या आहेत. महिला तर ऑपरेशन थिएटर किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या बार काऊन्सिलमध्ये जात असतील तर त्या खोल समुद्रातही जाऊ शकतात. २६ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला एकतर कायमस्वरुपी आयोग स्थापन करा अन्यथा न्यायालय आदेश देईल असे सांगण्यात आले.याचिकाकर्त्या प्रियंका त्यागी यांच्या बाजूने उपस्थित असलेल्या ज्येष्ठ वकील अर्चना पाठक दवे यांनी जोरदार युक्तिवाद केला. ते खंडपीठाला म्हणाले, कोस्ट गार्ड महिला अधिकाऱ्यांशी भेदभाव करतात. यावर ॲटर्नी जनरल आर वेंकटरामानी यांनी खंडपीठाला सांगितले की नौदल आणि लष्कराची तुलना चुकीची आहे. या दोन्ही यंत्रणा वेगवेगळ्या आहेत.२६ फेब्रुवारी रोजी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं की, "भारतीय तटरक्षक दलात पात्र महिला अधिकाऱ्यांना स्थायी कमिशन प्रदान करा.

# विद्यार्थ्यांना दाखवला 'द केरला स्टोरी' चित्रपट!

## द केरला स्टोरी चित्रपट दाखविण्यावरून काही दिवसांपूर्वी वाद

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**द केरला स्टोरी या चित्रपटावरून निर्माण झालेला वाद आजही शमलेला नाही. लोकसभा निवडणुकीला अवघे काही दिवस उरले असताना केरळमध्ये या चित्रपटावरून पुन्हा एकदा निर्माण झाला आहे. केरळच्या इडुक्की येथली सोरो-मलाबार चर्चने इयत्ता दहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना एका प्रशिक्षण शिबिरादरम्यान द केरला स्टोरी हा चित्रपट दाखविला.**








यामुळे आता वाद निर्माण झाला आहे. सोरो-मलाबार चर्चच्या निमित्ताने उन्हाळी सुट्टीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात लव्ह जिहादच्या विरोधात लढण्यासाठी हा चित्रपट दाखवून त्यावर चर्चा केली गेली.चर्चेच्या माध्यम विभागाचे अध्यक्ष फ्रा. जिन्स करक्कट यांनी टाइम्स ऑफ इंडियाला सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आम्ही हा चित्रपट दाखविला. २ ते ४ एप्रिल दरम्यान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराच्या कार्यक्रमात चित्रपट दाखविण्यासंदर्भातला उल्लेख केलेला होता. लव्ह जिहादच्या विरोधात लढणे, हा या प्रशिक्षण शिबिराचा महत्त्वाचा भाग होता. करक्कट पुढे म्हणाले की, लव्ह जिहादबद्दल समाजात म्हणावी तशी चर्चा होत नाही. या शिबिराच्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांमध्ये याबाबत जागरूकता निर्माण केली. चित्रपट दाखविण्यामागचा हेतू हाच होता की, चित्रपटात तरूणांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून भकटवले जात असल्याचे दाखवले गेले आहे. समाजात अशा गोष्टी होत आहेत, त्यापासून सावध राहावे, हेच दाखविण्याचा हा हेतू होता. या माध्यमातून आम्ही कोणत्याही धर्माला किंवा समाजाला लक्ष्य केलेले नाही. चर्च्या या कृतीबद्दल केरळचे विरोधी पक्षनेते व्हीडी सतीशन यांनी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, द केरला स्टोरी या चित्रपटाची कथा ही सत्यावर आधारित नाही. या चित्रपटातून केरळचा अवमान झाला आहे. केरळमध्ये जे झालेच नाही, ते यातून दाखविले गेले. त्यामुळेच दूरदर्शनवर हा चित्रपट दाखवला जाऊ नये, अशी मागणी आम्ही केली होती.भाजपाचे प्रदेशाध्यक्ष के. सुरेंद्रन यांनी याबद्दल प्रतिक्रिया देताना म्हटले की, या चित्रपटाला केरळमधील सर्वच भागातून आणि सर्व समाजातून पाठिंबा मिळाला आहे. केरळमधील शेकडो मुली लव्ह जिहादच्या शिकार झालेल्या आहेत. त्यामुळे चर्च्या कृतीचे आम्ही समर्थन करतो.


### समाजात म्हणावी तशी चर्चा होत नाही

» यामुळे आता वाद निर्माण झाला आहे. सोरो-मलाबार चर्चच्या निमित्ताने उन्हाळी सुट्टीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात लव्ह जिहादच्या विरोधात लढण्यासाठी हा चित्रपट दाखवून त्यावर चर्चा केली गेली.चर्चेच्या माध्यम विभागाचे अध्यक्ष फ्रा. जिन्स करक्कट यांनी टाइम्स ऑफ इंडियाला सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आम्ही हा चित्रपट दाखविला. २ ते ४ एप्रिल दरम्यान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराच्या कार्यक्रमात चित्रपट दाखविण्यासंदर्भातला उल्लेख केलेला होता.

# अजयच्या ‘मैदान’ चित्रपटावर स्थगिती आणण्याची मागणी

अजय देवगणची मुख्य भूमिका असलेला ‘मैदान’ हा चित्रपट बुधवारी (१० एप्रिल रोजी) चित्रपटगृहात प्रदर्शित होणार होता, पण आता या चित्रपटाचं प्रदर्शन एक दिवस पुढे ढकलण्यात आलं आहे. अशातच चित्रपटाविरोधात दाखल केलेली एक याचिका मुंबई कोर्टाने फेटाळून लावली आहे. ही याचिका चित्रपटाच्या प्रदर्शनावर स्थगिती आणण्यासंदर्भात होती. ११ एप्रिल रोजी प्रदर्शित होणाऱ्या अजय देवगणच्या ‘मैदान’ या हिंदी चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्यास मुंबई न्यायालयाने सोमवारी नकार दिला. शूटिंगसाठी कॅमेरे पुरवणाऱ्या मेहराफ्रीन इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेडकडून (MIPL) चित्रपटाचे निर्माते, बायव्यू प्रोजेक्ट्स एलएलपी आणि बोनी कपूर यांच्याविरुद्ध दिंडोशी येथील सिव्हील कोर्टात धाव घेतली होती.६४,५९,५७७ रुपयांची थकबाकी असल्याने चित्रपटाच्या प्रदर्शनावर स्थगिती आणावी, असं याचिकाकर्त्यांचं म्हणणं होतं. व्याजासह १,०७,२१,९३० रुपयांची थकबाकी असून ते पैसे चित्रपटाच्या प्रदर्शनाआधी दिले जाईल, असं वचन निर्मात्यांनी दिलं होतं, असं एमआयपीएलने सांगितलं. त्यानंतर एमआयपीएलकडून २१ टक्के दराने व्याज व ६४,५९,५७७ रुपयांच्या न भरलेल्या थकबाकीसंदर्भात खटला




दाखल करण्यात आला होता.जोपर्यंत थकबाकी मिळत नाही तोवर चित्रपटाच्या प्रदर्शनावर स्थगिती आणावी अशी मागणी त्यांनी केली होती. पण युक्तीवादानंतर कोर्टाचे न्यायाधिश ए झेड खान यांनी स्थगितीची मागणी फेटाळली. पण बायव्यूने दोन आठवड्यांच्या आत ९६,०६,७४३ रुपयांची बँक गॅरंटी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.अजय देवगणची मुख्य भूमिका असलेला ‘मैदान’ हा चित्रपट बुधवारी (१० एप्रिल रोजी) चित्रपटगृहात प्रदर्शित होणार होता, पण आता या चित्रपटाचं प्रदर्शन एक दिवस पुढे ढकलण्यात आलं आहे. अशातच चित्रपटाविरोधात दाखल केलेली एक याचिका मुंबई कोर्टाने फेटाळून लावली आहे.

ही याचिका चित्रपटाच्या प्रदर्शनावर स्थगिती आणण्यासंदर्भात होती. ११ एप्रिल रोजी प्रदर्शित होणाऱ्या अजय देवगणच्या ‘मैदान’ या हिंदी चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्यास मुंबई न्यायालयाने सोमवारी नकार दिला.

## रेखा नावाचं वादळ

गुड्डी’ सिनेमा आला तेव्हा हिंदी सिनेसृष्टीला अत्यंत अवखळ आणि भूमिकेबद्दल तितकीच सजग असणारी अभिनेत्री मिळाली. ‘हम को मन की शक्ती देना, मन विजय करे’ या गाण्यात दोन वेण्या घातलेली जया भादुरी पुढे महानायकाची पत्नी होईल आणि राज ठाकरेंशी पंगा घेईल असं कुणाला सांगितलं असतं, तर तेव्हा खरंही वाटलं नसतं. जया भादुरी या बच्चन झाल्या आणि त्यांचं सगळं आयुष्यच बदलून गेलं असं म्हटलं तर, वावगं ठरणार नाही. अमिताभ बच्चन यांची पत्नी होणं हे सोपं नाही. मात्र ती ओळख त्यांनी मिरवली आणि महानायकाची पत्नी होणं काय असतं, हे दाखवूनही दिलं. ‘रेखा’ नावाचं वादळही त्यांनी आपल्या खंबीरपणाने परतवून लावलं.अभिनेत्री जया भादुरी यांचा जन्म ९ एप्रिल १९४८ चा. त्यांचा पहिला सिनेमा १९६३ साली आला. सत्यजीत रे यांच्या ‘महानगर’ मध्ये त्यांनी वयाच्या १५ व्या वर्षीच भूमिका साकारली होती.

## जान्हवी कपूरचं ठरलं?

दिवंगत श्रीदेवी आणि चित्रपट निर्माते बोनी कपूर यांची लाडकी लेक व लोकप्रिय अभिनेत्री जान्हवी कपूर मागच्या काही दिवसांपासून तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. जान्हवीने ‘कॉफी विथ करण’ च्या आठव्या पर्वात बहीण खुशीबरोबर हजेरी लावली होती. या शोमध्ये तिने वैयक्तिक आयुष्याबद्दल खुलासा केला. तिने शिखर पहारियाबरोबर रिलेशनशिपमध्ये असल्याचं या शोमध्ये सांगितलं होतं.शिखरबरोबरचं नातं जाहीर केल्यावर जान्हवी अनेकदा त्याच्यासोबत देवदर्शनाला जाताना दिसते. जान्हवी व शिखर दोन-तीनवेळा एकत्र तिरुपतीला दर्शनासाठी गेले होते. एकवेळा तर जान्हवी गुडघ्यांवर चालत मंदिरात गेली होती. त्यानंतर आता तिचा एक नवीन व्हिडीओ समोर आला आहे, ज्यात ती अनवाणी पायांनी चालत सिद्धीविनायकाच्या दर्शनाला जाताना दिसतेय.जान्हवी कपूर वांद्रे इथून सिद्धिविनायक मंदिरापर्यंत अनवाणी पायाने चालत गेली. तिच्याबरोबर तिचा बॉयफ्रेंड शिखर पहारियाची आई स्मृती पहारियादेखील होत्या. दोघीही अनवाणी चालत बाप्पांच्या दर्शनासाठी पहाटे मंदिरात पोहोचल्या.



## रितेश देशमुखने मुलांसह उभारली गुढी

हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडवा साजरा केला जातो. त्याप्रमाणे आज सर्वत्र गुढीपाडवा साजरा केला जात आहे. घरोघरी गुढ्या उभारल्या जात आहेत. गोडाधोडाचे पदार्थ करून हिंदू नववर्ष साजरं होतं आहे. महाराष्ट्राचं लाडकं कुटुंब म्हणजे देशमुख कुटुंबाची गुढी उभारली आहे. देशमुखाची लाडकी सून, अभिनेत्री जिनिलीया देशमुखने गुढीला सजवतानाचा व्हिडीओ शेअर करत चाहत्यांना गुढीपाडव्याचा शुभेच्छा दिल्या आहेत. जिनिलीया देशमुखने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये रितेश देशमुख आपल्या लाडक्या मुलांबरोबर रिआन व राहिलासह गुढीला सजवताना दिसत आहे. हा व्हिडीओ शेअर करत जिनिलीयाने लिहिलं आहे, “पहाटे आमची गुढी तयार होतं आहे. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा.”एवढंच नाहीतर जिनिलीयाने गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देत रितेशबरोबरचा एक मजेशीर व्हिडीओ देखील शेअर केला आहे.

दरम्यान, रितेश-जिनिलीयाच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, फ्रेबुवारीमध्ये ‘राजा शिवाजी’ या चित्रपटाची रितेशने घोषणा केली. या चित्रपटाचं दिग्दर्शन तो स्वतः करणार आहे. तसेच या चित्रपटाच्या निर्मितीची धुरा जिनिलीया सांभाळणार आहे. २०२५ला ‘राजा शिवाजी’ चित्रपट मराठी व हिंदी भाषेत प्रदर्शित होणार आहे.

## हिरव्या साडीत खुललं माधुरी दीक्षितचं सौंदर्य

माधुरी दीक्षितचे जगभरात लाखो चाहते आहेत. वेस्टर्न असो किंवा पारंपरिक कोणत्याही लूकमध्ये ती चाहत्यांना अगदी सहज ‘मोहिनी’ घालते. माधुरीला बॉलीवूडची ‘धकधक गर्ल’ म्हणून देखील ओळखलं जातं. आज गुढीपाडव्याच्या सणानिमित्त अभिनेत्रीने खास मराठमोळा साज केला आहे. आपल्या लाखो चाहत्यांना माधुरीने खास मराठमोळ्या अंदाजात गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत. माधुरीने या व्हिडीओमध्ये म्हणते, “चंदनाच्या काठीवर शोभे सोन्याचा करा, साखरेच्या गाठी आणि कडुलिंबाचा तुरा...मंगलमय गुढी, ल्याली भरजरी खण, स्नेहाने साजरा करा पाडव्याचा सण...गुढी पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा! मराठी नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...!”हिरवी पैठणी साडी, गळ्यात नाजूक हार, नाकात नथ, हातात पाटल्या या लूकमध्ये माधुरी खूपच सुंदर दिसत आहे. सणानिमित्त मराठमोळा लूक करून चाहत्यांना शुभेच्छा दिल्याने सध्या अभिनेत्रीच्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. दरम्यान, माधुरी दीक्षित सध्या ‘डान्स दीवाने’ या कार्यक्रमात परीक्षकाची भूमिका निभावत आहे. नुकताच तिची व डॉ. श्रीराम नेने यांची निर्मिती असलेला ‘पंचक’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. यामध्ये मराठी कलाविश्वातील दिग्गज कलाकारांनी भूमिका साकारल्या होत्या.माधुरी दीक्षितचे जगभरात लाखो चाहते आहेत. वेस्टर्न असो किंवा पारंपरिक कोणत्याही लूकमध्ये ती चाहत्यांना अगदी सहज ‘मोहिनी’ घालते. माधुरीला बॉलीवूडची ‘धकधक गर्ल’ म्हणून देखील ओळखलं जातं. आज गुढीपाडव्याच्या सणानिमित्त अभिनेत्रीने खास मराठमोळा साज केला आहे.



# शशांक-आशुतोषची भागीदारी ठरली व्यर्थ!

## हैदराबादचा पंजाबवर 2 धावांनी निसटता विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पंजाबच्या घरच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या सामन्यात हैदराबादने निसटता विजय मिळवला आहे. अखेरच्या चेंडूवर हैदराबादने पंजाबवर अवघ्या २ धावांनी विजय मिळवला. पंजाबच्या शशांक सिंग आणि आशुतोष शर्मा यांनी पुन्हा एकदा संघासाठी तुफान खेळी केली . या दोघांनी ५० अधिक धावांची शानदार भागीदारी रचली पण संघाला विजय मिळवून देण्यात अवघ्या दोन धावांनी ते चुकले.**





हैदराबादचा या मोसमातील हा तिसरा विजय आहे. या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ गडी गमावून १८२ धावा केल्या. प्रत्युत्तरात पंजाब किंग्जला २० षटकांत ६ गडी गमावून १८० धावा करता आल्या. शेवटच्या २०व्या षटकातील थरार या सामन्यात पाहायला मिळाला.२०वे षटक टाकण्यासाठी जयदेव उनाडकट आला होता. तत्पूर्वी या पंजाबच्या शिलेदारांनी १९व्या षटकात १० धावा केल्या होत्या. शेवटच्या ६ चेंडूत पंजाबला २९ धावांची गरज होती. पहिल्या चेंडूवर आशुतोष शर्माने षटकार लगावला. पुढचे दोन्ही चेंडू वाईड होते. आता २१ चेंडूत ५ धावांची गरज होती. पुढच्या चेंडूवर आशुतोष पुन्हा एक षटकार लगावला. तिसऱ्या चेंडूवर दोन धावा घेण्यात यश आलं. तिसऱ्या आणि चौथ्या चेंडूवर दोन धावा घेण्यात यश आलं. आता २ चेंडूत ११ धावा हव्या होत्या. पाचवा चेंडू उनाडकटने पुन्हा वाईड टाकला. पुढचा चेंडू पुन्हा आशुतोषने उचलला, चेंडू खूप वर गेला पण त्रिपाठीने त्याचा झेल सोडला तरीही या दोघांना एकच धावा घेता आली. एका चेंडूत ९ धावा हव्या होत्या आणि शेवटच्या चेंडूवर शशांकने षटकार लगावला पण २ धावांनी पंजाबने सामना गमावला.शशांक सिंगने २५ चेंडूत ६ चौकार आणि एका षटकारासह सर्वाधिक ४६ धावा केल्या. तर आशुतोष शर्माने१५ चेंडूत २ षटकार आणि ३ चौकारांसह ३३ धावा केल्या. सॅम करन (२९) आणि सिकंदर रजा (२८) यांनी भागीदारी रचत सामना आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न केला पण जास्त काळ मैदानात टिकू शकले नाही. तर शिखर धवन १४ धावांवर बाद झाला.प्रभसिमरन सिंग अवघ्या ४ धावा करत बाद झाला तर बेयरस्टोला खातेही उघडता आले नाही. हैदराबादकडून भुवनेश्वर कुमारने २ विकेट घेतले तर कमिन्स, नटराजन, नितीश रेड्डी आणि उनाडकट यांनी प्रत्येकी १ विकेट मिळवली. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैदराबादला त्यांच्या डावाची सुरुवात फारशी चांगली करता आली नाही. संघाचे टॉप ऑर्डरमधील फलंदाज एकामागून एक माघारी परतले. मात्र यानंतर नितीश रेड्डी आणि अब्दुल समद यांनी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. या दोघांनीही पंजाबसमोर चांगलीच फटकेबाजी केली. रेड्डीने ३७ चेंडूत ६४ तर समदने १२ चेंडूत २५ धावा केल्या. शेवटी शाहबाज अहमदनेही काही चांगले फटके लगावले आणि सतत विकेट गमावूनही हैदराबादने ९ बाद १८२ धावांचा आकडा गाठला. पंजाबकडून अर्शदीप सिंगने सर्वाधिक ४ विकेट्स घेत २९ धावा दिल्या. तर सॅम करन आणि हर्षल पटेलने प्रत्येकी २ विकेट मिळवल्या. रबाडालाही एक विकेट मिळवण्यात यश आले.

### हैदराबादचा हा तिसरा विजय

» हैदराबादचा या मोसमातील हा तिसरा विजय आहे. या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ गडी गमावून १८२ धावा केल्या. प्रत्युत्तरात पंजाब किंग्जला २० षटकांत ६ गडी गमावून १८० धावा करता आल्या. शेवटच्या २०व्या षटकातील थरार या सामन्यात पाहायला मिळाला.२०वे षटक टाकण्यासाठी जयदेव उनाडकट आला होता. तत्पूर्वी या पंजाबच्या शिलेदारांनी १९व्या षटकात १० धावा केल्या होत्या. शेवटच्या ६ चेंडूत पंजाबला २९ धावांची गरज होती. पहिल्या चेंडूवर आशुतोष शर्माने षटकार लगावला. पुढचे दोन्ही चेंडू वाईड होते. आता २१ चेंडूत ५ धावांची गरज होती. पुढच्या चेंडूवर आशुतोष पुन्हा एक षटकार लगावला. तिसऱ्या चेंडूवर दोन धावा घेण्यात यश आलं.

# रसेलने धोनी मैदानात येताच कानावर हात का ठेवले?

## चेपॉकच्या मैदानात धोनीला पाहताच चाहत्यांचा उत्साह शिगेला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**एम एस धोनीला फलंदाजी करताना पाहण्यासाठी चाहते उत्सुक असतात. चेन्नईचा सामना म्हटलं की धोनी कधी एकदा फलंदाजीला येतोय याची चाहते वाट पाहत असतात, चेपॉकच्या मैदानात तर धोनीची वेगळीच क्रेझ आहे. सोमवारी झालेल्या केकेआरविरूद्धच्या सामन्यातही धोनी चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी उतरला आणि मैदानात एकच जल्लोष सुरू झाला. चेन्नईला विजयासाठी ३ धावांची आवश्यकता असताना धोनीला फंलदाजीला येताना पाहून चाहत्यांनी मैदानात इतका आवाज केला की बाऊंड्री लाईनजवळ असलेल्या रसेलने आपले कान दोन्ही हातांनी झाकले.**




केकेआरविरूद्ध चेन्नईचा सामना हा सीएसकेच्या घरच्या मैदानावर खेळवला जात होता. IPL 2024 च्या पहिल्या ४ सामन्यांमध्ये चेन्नईने चेपॉकवर दोन सामने खेळले होते. पण या दोन्ही सामन्यात धोनी फलंदाजीला उतरला नाही. त्यामुळे धोनीला पाहताच चाहत्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. चेन्नईला विजयासाठी ३ धावांची गरज असताना वैभव अरोराने शिवम दुबेला क्लीन बोल्ड केले. यानंतर धोनी फलंदाजीला आला. धोनीची फलंदाजी पाहण्याच्या आशेने सामना पाहायला आलेल्या लोकांचे स्वप्न पूर्ण झाले. धोनीने मात्र ३ चेंडूंचा सामना करत एक धाव घेत नाबाद राहिला.महेंद्रसिंग धोनी जेव्हा क्रिजवर आला तेव्हा संपूर्ण चेपॉक स्टेडियम 'धोनी धोनी' या नावाने दुमदुमत होते. प्रेक्षकांच्या उत्साहाला पारावर उरला नव्हता. तो सतत जोरजोरात धोनीच्या नावाचा जयघोष करत होते. धोनी मैदानावर येत असतानाचा आवाजाने १२५ डेसिबलपर्यंतची सीमा गाठली होती. हा आवाज इतका होता की कोलकाता नाईट रायडर्सचा अष्टपैलू खेळाडू आंद्रे रसेलला कान झाकावे लागले. रसेल सीमारेषेजवळ क्षेत्ररक्षण करत होता आणि आवाज इतका टिपेला पोहोचला होता की रसेलने कानावर हातच ठेवले. ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे.आंद्रे रसेलने सामन्यानंतर इन्स्टाग्रामला एक स्टोरी पोस्ट केली आहे. ज्यामध्ये धोनीसोबतचा त्याचा आणि धोनी-गंभीरचा सामन्यानंतरचा फोटो आहे. या फोटोला त्याने कॅप्शन देत म्हटले की, जगातला सर्वाधिक चाहते लाभलेला खेळाडू. धोनीची क्रेझही चेन्नईच्या प्रत्येक सामन्यात आणि इतर संघांच्या घरच्या मैदानावरही तितकीच दिसून येते.

### चेन्नईचा तिसरा विजय

» चेन्नई सुपर किंग्जचा या मोसमातील हा ५वा सामना होता. संघाने तिसरा विजय मिळवला आहे. धोनीला पाहताच चाहत्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. सीएसकेने या मोसमातील तिन्ही विजय त्यांच्या घरच्या मैदानावरच मिळवले. दोन सामन्यांमध्ये चेन्नईला दिल्ली आणि हैदराबादविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. चेपॉक हा नेहमीच चेन्नईचा गड राहिला आहे आणि इथे त्यांना हरवणे कोणत्याही संघासाठी सोपे नाही.